लोकमत



**प्रबोधन व समुपदेशन :** लोहा तालुक्यातील पांगरी येथील एकाच कुटुंबातील तीन मुलांनी सहा वर्षात आत्महत्या केल्यानंतर प्रशासनाकडून दखल घेत ७ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी अरुण डोंगरे यांनी तुकाराम बुद्रूक यांची भेट घेवून त्यांचे प्रबोधन व समुपदेशन केले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी संतोष पाटील, तहसीलदार डॉ. बिरादार, पांगरीचे सरपंच सुदाम पाटील व अन्य.

# जिल्हाधिकाऱ्यांनी जागविला गावकऱ्यांत आत्मविश्वास

## पांगरीतील आत्महत्या रोखण्यासाठी मनोविकार तज्ज्ञांचे समुपदेशन; अनेक कुटुंबांना भेटी

**लोहा, ता. ८ (बातमीदार)** : गावातील तरुणांनी एकत्रित येवून राजकारणविरहीत विचारविनिमय केला पाहिजे. गावात एकी असेल तर निश्चित गावाचे चित्र पालटायला वेळ लागणार नाही. एकोपा, समन्वय, एकजुटीच्या बळावर अनेक खेड्यात क्रांती झाली. नैराश्यातून जीवन संपविणे हा मार्ग नव्हे तर आलेल्या संकटावर मात करत मोठ्या हिंमतीने आपण जगले पाहिजे, हिंमत हरवून चालणार नाही. पांगरीतील होणाऱ्या आत्महत्या पुन्हा होवू नये, यासाठी गावपण जपण्याची गरज आहे, असा आत्मविश्वास जिल्हाधिकारी अरुण डोंगरे यांनी पांगरी (ता. लोहा) येथील शेतकऱ्यांमध्ये जागविला आहे.

लोहा तालुक्यातील पांगरी या गावातील तुकाराम बुद्रुक या शेतकऱ्याच्या तीन मुलांनी सहा वर्षांत गळफास लावून नोव्हेंबर महिन्यातच आत्महत्या केल्या. या गावातील तरुणांच्या होणाऱ्या आत्महत्येमुळे प्रशासन चिंतीत झाले. संवेदनशील मनाचे जिल्हाधिकारी अरुण डोंगरे यांची टीम मंगळवारी रात्री सात वाजता या गावात पोचली. त्यांनी शेतकरी कुटुंब तुकाराम यांच्या परिवाराशी संवाद साधला.

अतिरिक्त जिल्हाधिकारी संतोष पाटील, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार डॉ. आशिषकुमार बिरादार, अतिरिक्त जिल्हा कोषागार अधिकारी निळकंठ पाचंगे, डॉ. शिवाजीराव शिंदे, मनोविकारतज्ज्ञ डॉ. दि. बा. जोशी, तालुका कृषी अधिकारी विश्वंभर मंगनाळे, गटविकास अधिकारी प्रभाकर फांजेवाड, पोलिस निरीक्षक बालाजी मोहिते, उपविभागीय पाणीपुरवठा अधिकारी एंबलवाड, बीट जमादार सूर्यवंशी, मुधोळकर, ग्रामसेवक डी. पी. राठोड, तलाठी कदम, कृषी सहायक गच्चे, सरपंच सुदाम पाटील बुद्रुक, माजी सरपंच रामराव पाटील, उपसरपंच भारत गोपनर, त्र्यंबक बुद्रुक, देवीदास पाटील यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. पांगरी गावातील वाढत्या आत्महत्याशिवाय वेगवेगळे उदभवणाऱ्या रोगाचे निदान करण्यासाठी मनोविकार तज्ज्ञांचे समुपदेशन व सर्व गावकऱ्यांची आरोग्य तपासणी २५ डिसेंबरपूर्वी करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी डोंगरे यांनी जाहीर केले.

### डॉक्टरांचे प्रबोधन, गावकऱ्यांना आत्मबळ

**डॉ. शिवाजीराव शिंदे यांनी शेतकऱ्यांनी मरणाला का कवटाळावे, असा सवाल गावकऱ्यांसमोर उपस्थित करत आपल्या गरिबीच्या वेदनांना वाट मोकळी करून दिली. पूर्वी खूप गरिबी होती, तरी माणसे जगली, आता का मरण पत्करत आहेत, याची उकल करत गावकऱ्यांना लढण्याचे, जिद्दीने काम करण्याचे व नवतंत्रज्ञानाने शेती विकसित करण्याचे प्रबोधन केले. मनोविकारतज्ज्ञ डॉ. दि. बा. जोशी यांनी जीवनात फुकट दिलेले कधीच पूर्णत्वास जात नाही, असा सिद्धांत सांगत शेतकरी आत्महत्या करतो, यामागील सौदाहरण कारणे सांगितली.**



**लोहा : तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या घरी जाऊन जिल्हाधिकारी अरुण डोंगरे यांनी या कुटुंबांशी संवाद साधून धीर दिला.**